## दोषारोप निश्चितीपूर्वीचा शपथेवर जबाब

मी शपथेवर कथन करतो की,

नाव – दिलीप यल्लाप्पा कांबळे,

वय — ५७ वर्षे, हुद्दा – कृषी अधिकारी,

नेमणूक — विभागीय कृषी सहसंचालक कार्यालय, विभाग कोल्हापूर.

सरतपास अभियोग पक्षातर्फे सहायक सरकारी अभियोक्ता श्रीम. एस. वाय. गोबाडे.

**०१.** दिनांक २८/०४/२०१२ रोजी जिल्हा गुणवत्ता नियंत्रण निरिक्षक, सिंधुदुर्ग म्हणून कार्यरत होतो. त्यादिवशी मी खत निरिक्षक म्हणून देखील कार्यरत होतो. माझी नेमणूक रत्नागिरी येथे होती आणि सिंधुदुर्गचा प्रभार माझ्याकडे दिला होता. त्या दिनांक १९/०७/२०१० रोजीच्या आदेशाची झेरॉक्सप्रत प्रकरणात दाखल केली आहे. दिनांक २८/०४/२०१२ रोजी तालुका खरेदी विक्री संघ कणकवली येथे खताचा नमूना घेण्यासाठी गेलो होतो. मी तेथे खत १८:१८:१० मिश्र खताचे तीन नमूने घेतले. खत नियंत्रण आदेश मध्ये नमूद केलेल्या पध्दतीनूसार खताचे नमूने घेतले.

**०२.** त्यानंतर माझ्या जवळ असलेला जे–फॉर्म वर घाडीगावकर यांची सही घेतली त्यानंतर तीन पैकी एक नमूना आणि जे–फॉर्म घाडीगावकर यांचेकडे दिला. त्यानंतर दिनांक ३०/०४/२०१२ रोजी दोन पैकी एक नमून आणि के–फॉर्म तपासणीसाठी पूणे येथील खत निरिक्षण प्रयोगशाळेत पाठवला. आता मला सदरचा के–फॉर्म दाखविला. त्यावर माझी सही आहे. त्यातील मजकूर बरोबर आहे. सबब, त्यास **निशाणी क्र. ६६** देण्यात येत आहे. प्रयोगशाळेतून खत निरीक्षण अहवाल प्राप्त झाला होता. त्यामध्ये खत अप्रमाणित म्हणून घोषीत केले. आता मला प्रयोगशाळेतून प्राप्त झालेला फॉर्म एल दाखविला. तो तोच आहे. सबब, त्यास **निशाणी क्र. ६७** देण्यात येत आहे. संपूर्ण अभिलेखाची पडताळणी

केली असता फेरीस्तामध्ये नमूद असलेला जे–फॉर्म आढळून आला नाही. पूढील कारवाई ओहोळ यांनी केली आहे.

सरतपास पूर्ण.

आरोपीं तर्फे दोषारोप निश्चित होईपर्यंत उलटतपास तहकूब.

श्रवणोत्तर स्वीकृत,

सही/–

(श्रीम. व्ही. आर. जांभुळे.)

दिनांकः ११/०३/२०२५.

मुख्य न्यायदंडाधिकारी,

सिंधुदुर्ग – ओरोस.